# मिरा भाईंदर महानगरपालिका

**लेखापरीक्षण कार्यालय**

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/मुलेप/ ००७ /2023-24 दि. २१/०४/2023

## // परिपत्रक //

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये विविध विभागाकडुन विविध विकास कामांसाठी व खरेदीसाठी ऑनलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येतात. सदर निविदा मागविताना सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभाग शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णयानुसार निविदा पात्रतेच्या अटीशर्ती व इतर विभागामार्फत मालाची खरेदी करण्यासाठी शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या खरेदीबाबतच्या शासन निर्णयानुसार पात्रतेच्या अटीशर्ती घालत असतात. सदरची विकास कामे किंवा खरेदी करु इच्छित असणा-या ठेकेदार किंवा पुरवठादाराकडुन ऑनलाईन पद्धतीने निविदा भरण्यात येऊन त्यासोबत विभागाने मागणी करण्यात आलेली कागदपत्रे अपलोड केली जातात.

उपरोक्त प्रक्रीया होत असताना ठेकेदार किंवा पुरवठादाराने सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यता तपासणे अत्यंत आवश्यक असते. त्यासाठी सर्व विभागांनी ठेकेदारांनी ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यता व्यक्तीशः तपासुन खात्री करावी व तसे प्रस्तावासोबत प्रमाणित करावे. ठेकेदारांनी किंवा पुरवठादारांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबत भविष्यात काही तक्रार झाल्यास संबंधित विभाग जबाबदार राहील. त्यामुळे सर्व विभागांनी कागदपत्रांच्या सत्यतेबाबत गांभीर्याने लक्ष घालुन प्रस्ताव लेखापरीक्षण विभाग तसेच मा. आयुक्त यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवावेत.

(सुधीर नाकाडी)
मुख्यलेखापरिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:-

1) उपायुक्त (सर्व)
2) विभागप्रमुख / खातेप्रमुख (सर्व)

प्रत माहीतीस्तव:-

1) मा. आयुक्त सो.
2) मा. अति. आयुक्त (1) व (2)